मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# होर्डिंगधारकांनी घेतला कारवाईचा धसका

## एका आठवड्यात दोनशेहून अधिक अर्ज मंजुरीसाठी दाखल : पीएमआरडीए प्रशासनाकडून कारवाई सुरूच

**पिंपरी | प्रतिनिधी**

गेल्या आठवड्यात मुळशी परिसरात पुणे महानगर क्षेत्रीय विकास प्राधिकरणाकडून तीन अवाढव्य होर्डिंगवर कारवाई करण्यात आली. ती संपूर्ण जमीनदोस्त करण्यात आली दरम्यान, या कारवाईची धास्ती घेतल्यानंतर प्राधिकरणाकडे होर्डिंग मंजुरीसाठी विविध ठिकाणाहून तब्बल दोनशेहून अधिक अर्ज दाखल झाले आहेत. मात्र, अर्ज आलेले होर्डिंग बाजूला ठेवून इतरांवर कारवाई सुरू राहणार असल्याचे प्राधिकरणाने स्पष्ट केले.



होर्डिंगचे सर्वेक्षण झाल्यानंतर प्राधिकरणाने त्या होर्डिंगधारकांना मंजुरी मिळण्याबाबत अर्ज करण्याचे आवाहन केले होते. मात्र, त्याची कोणीही दखल घेतली नाही. तर, अवघे ३० ते ४० अर्ज आले होते. त्यातही होर्डिंगवर कारवाईबाबत प्रत्यक्षात मंजुरी आणि लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता यामुळे थेट कारवाई होत नव्हती. अखेर निवडणुकीच्या निकालानंतर प्राधिकरणाकडून होर्डिंगवरती कारवाई सुरू करण्यात आली. सर्वाधिक होर्डिंग असलेल्या मुळशी तालुक्यातून कारवाई सुरू केली. गेल्या आठवड्यात या ठिकाणी जवळपास ३ अनधिकृत होर्डिंग जमीनदोस्त करण्यात आले. त्यानंतर कारवाईच्या धास्तीने प्राधिकरण अंतर्गत असणाऱ्या हद्दीतील होर्डिंगधारक प्राधिकरणात पळत आले. त्यांनी मंजुरीबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

### पालखी मार्गावरील होर्डिंग हटवणार

**» संत तुकाराम महाराज पालखी मार्गावरील असलेले व प्राधिकरणातील हद्दीत समाविष्ट अनधिकृत होर्डिंग प्रामुख्याने हटवले जाणार आहेत. त्यानुसार पुरंदर तालुक्यातील झेंडेवाडी, दिवे घाट, काळेवाडी या परिसरातील होर्डिंग हटवण्याबाबत कार्यवाही केली जाणार असल्याचे प्राधिकरणाने स्पष्ट केले. त्यानुसार त्यांना नोटिसा देऊन काढून घेण्याची ताकीद दिली आहे.**

प्राधिकरणाच्या सर्वेक्षणात जवळपास एक हजाराहून अधिक अनधिकृत होर्डिंग आढळून आलेले आहेत. त्यावर टप्प्याटप्प्याने कारवाई सुरू असताना, दुसरीकडे या होर्डिंगना मंजुरी मिळावी यासाठी मोठ्या प्रमाणात अर्ज दाखल झालेले आहेत. त्यामुळे त्या अर्जांची छाननी करण्यात येणार आहे. मंजुरीसाठी अर्ज आलेल्या होर्डिंगवरील कारवाईबाबत विचार करण्यात येणार आहे. तर, अद्यापही मंजुरीसाठी अर्ज न केलेल्या होर्डिंगधारकांवर इथून पुढे कारवाई सुरूच राहणार असल्याचे स्पष्ट केले. दरम्यान, प्राधिकरण अंतर्गत असलेल्या जवळपास १७ हून अधिक गावांनी त्या हद्दीमधील असलेल्या अनधिकृत होर्डिंगवर कारवाई करावी , असे पत्र प्राधिकरणाला दिले होते. त्यात होर्डिंगची संख्या आणि त्याचे ठिकाणही नमूद केले होते. त्यामुळे अप्रत्यक्षरीत्या स्थानिक ग्रामपंचायतीने देखील अनअधिकृत होर्डिंगबाबत आवाज उठवला होता. त्यामुळे प्राधिकरणाला कारवाई करण्यासाठी पावले उचलावी लागली होती.

# अपघात टाळण्यासाठी अखेर गतिरोधक बसविले

## युवा नेते निलेश बोराटे यांच्या पुढाकारातून प्रश्न मार्गी, सोसायटीधारकांमध्ये समाधान

**पिंपरी | प्रतिनिधी**

परिसरातील स्वराज सोसायटी जवळील रस्त्यावर सातत्याने अपघात होत असल्याने अपघात टाळण्यासाठी नागरिकांनी गतिरोधक बसविण्याची मागणी केली. त्यानुसार युवा नेते निलेश बोराटे यांनी पाहणी करून आमदार महेश दादा लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली गतिरोधकाचे काम मार्गी लावले. त्यामुळे परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले. रस्त्यावर गतिरोधकाचे काम सुरु करण्यासाठी स्वराज सोसायटीतील नागरिक आणि युवा नेते निलेश बोराटे यांनी पोलिस आयुक्त विनयकुमार चौबे यांची भेट घेऊन परवानगी घेतली. परवानगी मिळताच काम सुरु करून, मार्गी लावले. या परिसरातील रस्त्यावर गतीरोधक नसल्यामुळे वाहने भरधाव वेगाने येत होते. त्यामुळे अपघातांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली होती. मागील काही दिवसांपूर्वी एका चारचाकी गाडीने महिलेला धडक दिल्याची घटना घडली. त्यामुळे परिसरातील नागरिकामध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले होते. अपघात टाळण्यासाठी रस्त्यावर गतिरोधक बसविण्याची मागणी नागरिकांनी युवा नेते निलेश बोराटे यांच्याकडे केली. त्यानंतर त्यांनी गतिरोधक बसविण्याचे काम मार्गी लावले.





> परिसरातील नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी कायदेशीर परवानगी घेऊन आमदार महेश दादा लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वराज सोसायटीसमोरील रस्त्यावर गतिरोधकाचे काम मार्गी लावले. यामुळे भविष्यात होणारे अपघात थांबले जातील.
>
> \- निलेश बोराटे, युवा नेते.

# पुणे शहरात झिका व्हायरसचे थैमान

## शहरातील पिंपरीपासून ते निगडीपर्यंत मेट्रोच्या कामाला गती : बंद कामाला पुन्हा सुरुवात

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे शहरात गेल्या आठवडाभरापासून झिका विषाणूचा फैलाव मोठ्या प्रमाणात होत आहे. पुणे शहरात आतापर्यंत सहा जणांना झिका व्हायरसची लागण झाली आहे. यात दोन गर्भवती महिलांचा समावेश असल्याची माहिती आरोग्य अधिकाऱ्यांनी दिली आहे. एरंडवणे परिसरातील एका 28 वर्षीय गर्भवती महिलेला झिका व्हायरसची लागण झाली आहे.



गेल्या काही दिवसांपासून पुण्यात झिका विषाणूने थैमान घातले आहे. पुण्यात एका डॉक्टर आणि त्याच्या मुलीला झिका विषाणूची लागण झाली होती. हे पुण्यातील झिकाचे पहिले प्रकरण होते. त्यानंतर आता आरोग्य अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, एरंडवणे येथील तीन गर्भवती महिलांच्या रक्ताचे नमुने तपासणीसाठी पाठवण्यात आले होते. त्यापैकी दोन महिलांचा अहवाल निगेटिव्ह आला आहे. तर एका महिलेचा अहवाल पॉझिटिव्ह आला आहे. यामुळे पुण्यात झिका विषाणूची लागण झालेल्यांची संख्या 6 पर्यंत पोहोचली आहे.

आतापर्यंत दोन गरोदर महिलांना झिका विषाणूची लागण झाली आहे. सध्या या दोन्हीही महिलांची प्रकृती स्थिर आहे. यानंतर आता एरंडवणे भागातील आणखी तीन जणांच्या रक्ताचे नमुने तपासणीसाठी पाठवण्यात आले आहेत. अद्याप याचे रिपोर्ट समोर आलेले नाही.

**गर्भवती महिलांना जास्त प्रमाणात धोका**

पुण्यात झिका विषाणूचा वाढता धोका लक्षात घेता आरोग्य विभागाकडून विविध उपाययोजना केल्या जात आहेत. पुणे महापालिकेचा आरोग्य विभाग हा सर्व रुग्णांवर लक्ष ठेवून आहे. अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, खबरदारीचा उपाय म्हणून निर्जंतुकीकरण आणि फवारणी यासारख्या उपाययोजना केल्या जात आहेत. तसेच गर्भवती महिलांना या विषाणूचा जास्त प्रमाणात धोका संभवतो. गर्भवती महिलांच्या गर्भावर या विषाणूचा परिणाम होऊ शकतो. यामुळे बाळाच्या डोक्यात जन्मजात दोष किंवा इतर समस्या उद्भवू शकतात, अशी माहिती आरोग्य अधिकाऱ्यांनी दिली.

झिका विषाणू पसरविणारे डास घरामध्ये आणि बाहेर अशा दोन्ही ठिकाणी आढळू शकतात. जरी हे डास सहसा दिवसाच्या वेळी चावत असले तरी रात्रीच्या वेळीही ते चावण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

### झिका म्हणजे काय?

**» झिका हा एक विषाणू असून तो डासांपासून पसरतो. 1947 मध्ये युगांडाच्या झिका जंगलात तो प्रथम आढळला होता. 2015 मध्ये अमेरिकेत, विशेषतः ब्राझीलमध्ये लक्षणीय उद्रेक झाल्यानंतर या विषाणूने जागतिक पातळीवर सर्वांचे लक्ष वेधले. हा उद्रेक मायक्रोसेफली (Microcephaly) या आजारासह जन्मलेल्या बाळांच्या वाढीशी संबंधित होता. मायक्रोसेफली हा एक गंभीर जन्मदोष आहे; ज्यामध्ये लहान मुलाचे डोके असामान्यपणे लहान असते आणि मेंदू अविकसित असतो. त्यावरून हे सिद्ध झाले, "गर्भवती महिलांना या विषाणूचा जास्त धोका असतो आणि त्यांच्या बाळावरही त्याचा दुष्परिणाम होऊ शकतो."**

# आरटीओकडून अनफिट स्कूलबसवर कारवाई होणार

## वाहन चालवताना मोबाईल वापरणे बंद, परवाना व बिल्ला तपासणार : शहरातील 3 हजार बसवर ठेवणार वॉच

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील शाळा जूनपासून सुरू झाल्या आहेत. शाळा सुरू होण्यापूर्वीच पिंपरी-चिंचवड प्रादेशिक परिवहन कार्यालयाने (आरटीओ) थकलेल्या फिटनेस प्रमाणपत्राबाबत स्कूल बसचालकांना नोटीस दिल्या होत्या. मात्र अद्यापी, अनेक स्कूल बसचालकांनी तपासणी करून घेतली नाही. त्यामुळे अखेर अशा वाहनांवर कारवाई सुरू केली असून, प्रत्येक बस चालकाने राज्य शासनाने जारी केलेल्या २०११ मधील बस नियमावलीचे तंतोतंत पालन करणे आवश्यक असल्याचे आरटीओने स्पष्ट केले.



पिंपरी-चिंचवड शहरात २९५१ स्कूलबसची आरटीओत नोंद आहे. शाळा सुरू होण्यापूर्वी म्हणजेच ३१ मे पर्यंत यातील जवळपास ७० टक्क्यांहून अधिक वाहनांनी तपासणी केली आहे. मात्र अद्यापी २५ टक्के अनफिट वाहने रस्त्यांवर धावत आहेत. त्यामुळे अशा धोकादायक वाहनातून विद्यार्थ्यांची वाहतूक होत असल्याने त्यावर देखरेख ठेवण्याचे काम आरटीओच्या वतीने करण्यात येत आहे. फिटनेस नसताना स्कूल बस रस्त्यांवर दिसल्यास त्या चालकावर कारवाई करण्याचा इशारा परिवहन अधिकाऱ्यांनी दिला आहे.

विद्यार्थ्यांची वाहतूक करणारे स्कूल बसचालक प्रवासी क्षमतेपेक्षा अधिक विद्यार्थी बसमधून नेत असतात. आसन क्षमतेपेक्षा अधिक मुलांना बसवून दाटीवाटीतून ने-आण करणाऱ्या चालकांना दंड करण्याचा इशारा परिवहन विभागाने दिला आहे. मुले ज्या वाहनांतून शाळेत ये-जा करतात. त्या वाहनांकडून नियमावलीचे पालन होते की नाही याची माहिती प्रत्येक शाळेतील स्कूल बस कमिटी व पालकांना असणे गरजेचे आहे. शासनाने जारी केलेल्या २०११ मधील स्कूलबस नियमावलीचे तंतोतंत पालन करणे बंधनकारक आहे. स्कूलबस चालकांनी वाहन चालवताना मोबाईल वापरू नये. विद्यार्थ्यांनी खिडकी अथवा दरवाजातून डोके-हात बाहेर काढू नये. प्रत्येक स्कूलबससाठी योग्यता प्रमाणपत्र बंधनकारक असल्याचे आरटीओ अधिकारी सांगतात.

दरम्यान, स्कूलबस चालकांना नियम लागू केले आहेत. त्याचे पालन करणे त्यांना आवश्यक आहे. दुसरीकडे, अनफिट स्कूलवर आरटीओचे वायुवेग पथक नजर ठेवून आहेत. तपासणी केली नसल्यास अथवा नियम भंग केलेले आढळून आल्यास कारवाई करण्यात येईल, असा इशारा देण्यात आलेला आहे. त्याचप्रमाणे पिंपरी चिंचवड शहरातील अनेक शाळेत विद्यार्थी ये-जा करणाऱ्या आणखीन काही स्कूल व्हॅन देखील आहेत. त्यांची देखील तपासणी करण्यात येणार आहे.

### ग्रामीण भागातील शालेय बसच्या पाहणीसाठी विशेष मोहीम

**» पिंपरी-चिंचवडप्रमाणेच ग्रामीण भागात देखील मोठ्या प्रमाणात स्कूलबस धावतात. मात्र, हे बसचालक नियम पाळत नाहीत, अशा काही तक्रारी आरटीओ कार्यालयात प्राप्त झाले आहेत. त्यानुसार ग्रामीण भागात म्हणजेच खेड, जुन्नर, आंबेगाव, तळेगाव, लोणावळा या परिसरात स्कूल बसची तपासणी करण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने एक विशेष मोहीम राबवण्यात येणार आहे. नुकत्याच झालेल्या अधिकाऱ्यांच्या बैठकीत हा प्रश्न उपस्थित झाला. त्यानुसार ग्रामीण भागात देखील स्कूलबस चालकांना आवाहन करण्यात येणार आहे. याबाबत प्रादेशिक परिवहन अधिकारी संदेश चव्हाण यांनी प्रत्येक अधिकाऱ्यांना त्याबाबत सूचना केल्या आहेत.**

# पहिल्या तिमाहीमध्ये तब्बल 432 कोटींचा कर जमा

## तब्बल 54 टक्के मालमत्ताधारकांनी घेतला सवलतींचा लाभ; आयुक्तांकडून जागरूक करदात्यांचे आभार

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाच्या तिजोरीमध्ये आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीमध्ये ४३२ कोटी रुपयांचा मालमत्ताकर संकलित करण्यात आला. शहरामध्ये निवासी, औद्योगिक, बिगर निवासी, मिश्र, मोकळ्या जमिनी आदी अशा एकूण ६ लाख ३० हजारांहून अधिक नोंदणीकृत मालमत्ता असून, यावर्षी त्यापैकी ५४ टक्के करदात्यांनी पहिल्या तिमाहीमध्येच मालमत्ताकर भरून विविध सवलतींचा लाभ घेतला आहे. करदात्यांनी जागरूकपणे कर भरून सवलतींचा लाभ घेतल्याने महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी जागरूक करदात्यांचे आभार मानले आहेत. नागरिकांनी मालमत्ताकर भरण्यासाठी करसंकलन विभागाने विविध उपाययोजना राबविल्या. त्याच्या माध्यमातून करदात्यांपर्यंत मालमत्ताकरावरील सवलतीबाबत विविध प्रकारे जनजागृती करण्यात आली. यामुळे नागरिकांना सवलतीबाबत माहिती होऊन नागरिकांनी पहिल्या तिमाहीमध्येच आपला मालमत्ताकर भरण्यासाठी प्राधान्य दिले आहे. सवलतीबाबत जनजागृती झाल्याने परिणामी, सन २०२४-२५ या चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीमध्ये एकूण मालमत्ताधारकांपैकी ५४ टक्के मालमत्ताधारकांनी मालमत्ताकर भरला.




### तब्बल 73 टक्के करदात्यांनी भरला ऑनलाइन स्वरूपात कर...

» शहरातील एकूण मालमत्ताधारकांपैकी ३ लाख ५७ हजार ११ इतक्या मालमत्ताधारकांनी ४३२ कोटींचा कर जमा केला असून त्यापैकी २ लाख ६२ हजार ५२२ इतक्या म्हणजेच ७३ टक्के मालमत्ताधारकांनी ऑनलाइन स्वरूपात कर भरून सवलतींचा लाभ घेतला आहे.

### सर्वाधिक निवासी मालमत्ताधारकांकडून मालमत्ताकराचा भरणा...

» गतवर्षीप्रमाणे यावर्षीही पालिकेने राबविलेल्या 'सिद्धी' प्रकल्पातून सुमारे ४०० महिलांनी मालमत्ताधारकांना बिलाचे वाटप केले, त्यामुळे नागरिकांनी ३० जूनपर्यंत सवलतींचा लाभ घेत कराचा भरणा केलेला आहे, तसेच विभागातील सर्व कर्मचाऱ्यांची सांघिक कामगिरी केली असून त्यामुळे करवसुलीमध्ये सातत्य ठेवण्यात विभागाला यश आले आहे. कर संकलनाच्या १७ झोनपैकी वाकडमध्ये सर्वाधिक ४९ हजार ३६ नागरिकांनी ६८ कोटी, तर पिंपरीनगर झोनमध्ये सर्वात कमी 3 हजार 982 मालमत्ताधारकांनी फक्त 3 कोटींचा कर भरला आहे, तसेच सर्वाधिक ३ लाख ११ हजार ६७ निवासी मालमत्ताधारकांनी तब्बल २६० कोटींच्या कराचा भरणा केला आहे, असे करसंकलन विभागाचे सहाय्यक आयुक्त नीलेश देशमुख यांनी सांगितले.

> शहरातील सर्व जबाबदार, प्रामाणिक आणि जागरूक करदात्यांनी यावर्षीही पहिल्या तिमाहीमध्ये कर भरून सवलतींचा लाभ घेतला आहे. त्याबद्दल सर्व जागरूक करदात्यांचे मनापासून आभार मानतो. शहरातील करदात्यांसाठी विभागाने जाहीर केलेल्या विविध योजनांचा लाभ घेत कराचा भरणा केल्याने शहराच्या प्रगतीमध्ये करदात्यांचा मोलाचा वाटा आहे. नागरिकांनी येत्या काळामध्येही शहराच्या प्रगतीसाठी कररूपी योगदान द्यावे.
>
> - शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका

> करसंकलन विभागाने गतवर्षीपासून करवसुलीसाठी विविध नावीन्यपूर्ण उपक्रम राबविले. यामुळे नागरिकांमध्ये कर भरण्यामध्ये उत्साह निर्माण झाला असून, नागरिक पहिल्या तिमाहीमध्येच कर भरून त्यावर सवलतीचा लाभ घेण्यासाठी पुढाकार घेत आहेत. यामुळे करसंकलनामध्ये गतवर्षीप्रमाणे यावर्षीही ४०० कोटींचा टप्पा पार केला आहे. नावीन्यपूर्ण कल्पना व उपक्रमांच्या सांघिक कामगिरीमुळे करसंकलनामध्ये आम्ही सातत्य राखून नागरिकांना पहिल्या तिमाहीमध्ये कर भरण्यासाठी प्रवृत्त करू शकलो आहोत.
>
> - प्रदीप जाभंळे-पाटील, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका

> करसंकलन विभागाद्वारे नागरिकांना मालमत्ताकरावरील सवलतींचा लाभ घेण्यासाठी जनजागृतीद्वारे, एसएमएसद्वारे आवाहन करण्यात आले. नागरिकांनी आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत पहिल्या तिमाहीमध्येच कर भरण्यास प्राधान्य दिले आहे. मालमत्ताकरावरील सवलतींची माहिती व मालमत्ताकराचे बिल वेळेवर पोहोचल्याने नागरिकांनी यावर्षीही पहिल्या तिमाहीमध्ये मोठ्या प्रमाणात कराचा भरणा केला आहे. करसंकलन विभागाने प्रकल्प 'सिद्धी' उपक्रमांतर्गत बिलांच्या केलेल्या वाटपाचा यामध्ये मोलाचा वाटा असून, विभागाने प्रत्येक आघाडीवर घेतलेल्या पुढाकारामुळे यावर्षी ४३२ कोटींचा कर जमा झाला आहे. नागरिकांनी वेळेवर कर भरून सवलतींचा लाभ घेतला, यामुळे त्यांचे मनापासून आभार व्यक्त करतो.
>
> - नीलेश देशमुख, सहाय्यक आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका

# इंद्रायणी नदी वाचवण्यासाठी महाविकास आघाडीच्यावतीने एल्गार आंदोलन

## आळंदीतील इंद्रायणी नदीकाठी सकाळी 11 वाजता होणार एल्गार आंदोलन

**पिंपरी | प्रतिनिधी**

लाखो वारकऱ्यांचे श्रद्धास्थान असलेली इंद्रायणी नदी ऐन आषाढी वारीमध्ये प्रचंड मोठ्या प्रमाणात प्रदूषित झालेली दिसून आली. नदीत विविध कारखान्याचे पाणी सोडल्याने नदीवर मोठ्या प्रमाणात फेस आला आहे. या फेसाचा पूर्ण तवंग नदीच्या सर्व पात्रात पसरला आहे आणि पाण्याला दुर्गंधी येत आहे. या नदीचे पाणी पवित्र समजले जाते आणि त्यात वारकरी स्नान करतात. हे पाणी सध्या इतके प्रदूषित आहे की, वारकऱ्यांनी स्नान केल्यानंतर त्यांना त्वचा विकारही झाल्याचे दिसून आले. गेले अनेक दिवस याबाबत तक्रारी करून प्रशासनाकडे पाठपुरावा करूनही कोणतीही ठोस कारवाई केलेली दिसून आलेली नाही. त्यामुळे गुरुवार दिनांक 4 जुलै 2024 रोजी महाविकास आघाडीच्या माध्यमातून एल्गार आंदोलन करण्यात येणार आहे. आळंदीतील इंद्रायणी नदीकाठी हे आंदोलन सकाळी 11 वाजता होणार असल्याची माहिती शिवसेनेच्या पुणे जिल्हा संघटिका सुलभा उबाळे यांनी दिली. त्यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे की लाखो वारकऱ्यांचे श्रद्धास्थान असलेली इंद्रायणी नदी प्रचंड मोठ्या प्रमाणात प्रदूषित झालेली आहे. नदीत विविध कारखान्यांचे पाणी सोडले जात आहे. पाणी अस्वच्छ असून ठिकठिकाणी घाण साचलेली आहे आणि जलपर्णीची समस्याही अजून मोठ्या प्रमाणात आहे. नदीकाठावर असलेल्या 'केमिकल आस्थापना' प्रक्रिया न करता त्यांचे रसायनमिश्रीत पाणी थेट नदीत सोडतात. यामुळे नदी मोठ्या प्रमाणात प्रदूषित होते. रसायनयुक्त पाणी नदीत सोडल्याने नदीचा



रंग कधी हिरवा, तर कधी पिवळा होतो, तसेच पाण्यातील प्राणवायू अल्प होत चालला आहे. यामुळे नदीतील मासे आणि अन्य जलचरांचे अस्तित्वही धोक्यात आले आहे. गेली दहा वर्ष पिंपरी चिंचवडमध्ये नदी सुधार प्रकल्प कागदावर आहे. नदी परिसरात राडारोडा टाकणे बंद झाले नाही. एसटीपी प्लांट देखील पूर्णत्वाला गेले नाही. तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ते आताचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी इंद्रायणी नदी प्रदूषणमुक्त करण्याचे आश्वासन दिले मात्र स्वतःचे बॉण्डिंग दुसऱ्याच्या पैशांमधून करण्याशिवाय मुख्यमंत्री ते येथील पर्यावरणाचा कळवळा असणारे भाजपचे स्थानिक आमदार यांनी इंद्रायणी नदी प्रदूषणमुक्त करण्यासाठी काय केले ते सांगावे, असेही पत्रात म्हटले आहे. इंद्रायणी नदीचे झालेले वाटोळे आणि पर्यावरणाचा होत असलेला ऱ्हास यामध्ये सत्ताधारी भाजपचा नाकर्तेपणा, भ्रष्टाचारीपणा कारणीभूत आहे. हा त्यांचा खरा चेहरा नागरिकांसमोर आणण्यासाठीच महाविकास आघाडीच्या वतीने एल्गार आंदोलन आळंदी येथे होत असल्याचेही प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे. यामध्ये महाविकास आघाडीचे सर्व पदाधिकारी कार्यकर्ते सहभागी होणार आहेत.

### नदीच्या नावाखाली स्वतःचा खिसा भरला

» पिंपरी चिंचवडमधील सत्ताधाऱ्यांनी या इंद्रायणी नदीच्या नावाखाली आपले उखळ पांढरे करून घेतले आहे. कोट्यावधीचे टेंडर काढून नदीच्या नावाखाली स्वतःचा खिसा भरला . नमामि इंद्रायणी प्रकल्प, रिव्हर सायक्लोथॉन, जलपर्णी काढणे ही त्यापैकी काही उदाहरणे आहेत याच समवेत काही भंगार व्यावसाईक त्यांच्या भंगारातील टाकाऊ कचरा थेट नदीत टाकतात. यात प्लास्टिकचा समावेशही मोठ्या प्रमाणात आहे. यामुळेही नदीचे प्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढते. याकडे पिंपरी-चिंचवड महापालिका आणि प्रदूषण नियंत्रण मंडळ यांचे पूर्णतः दुर्लक्ष आहे.

# टोकावडे, शिरगाव सजा दोन वर्षांपासून बंदच

## खेडच्या महसूल प्रशासनाच्या भोंगळ कारभाराची पोलखोल : ग्रामस्थ आक्रमक

**पुणे | प्रतिनिधी**

खेड तालुक्याच्या आदिवासी भागात टोकावडे आणि शिरगाव सजा कार्यालय गेल्या दोन वर्षांपासून बंद असल्याने महसूल प्रशासनाच्या भोंगळ कारभाराची पोलखोल झाली आहे.

शिरगाव सजा कार्यालयात तलाठी कार्यालयाला कुलूप नाही व त्यामध्ये वाऱ्यावर खराब झालेल्या महत्त्वाच्या कागदपत्राचा व्हिडीओ धुवोली गावाचे उपसरपंच शरद जठार, शिरगावचे अंकुश शिर्के यांनी काढून सोशल मीडियावर रविवारी (दि 30) पाठवला होता. कार्यालयातील कपाटात अनेक नागरिकांचे मतदान कार्ड ठेवण्यात आले होते ते वाटप करण्यात आले नव्हते. तलाठी कार्यालयाचे हे वास्तव जनतेसमोर व्हिडीओद्वारे समोर येताच या सजा अंतर्गत येणाऱ्या नागरिकांनी एकत्र येऊन नवीन तलाठी कोतवाल यांची मागणी करीत आंदोलनाचा पवित्रा घेतला होता.

शिरगाव आणि टोकावडे या दोन्ही सजा अंतर्गत भीमाशंकर, भोरगिरी, टोकावडे, भोमाळे, खालचे वरचे, पाभे, भिवेगाव, कारकुंडी, शिरगाव मंदोशी, मोरोशी, धामणगाव खुर्द, धुवोली, वांजळे, शेंदुर्ली ही गावे येतात. त्यांना वाडा सर्कल आहे. श्रीक्षेत्र ज्योतिर्लिंग भीमाशंकर या सजामध्ये येते मात्र या गावाचे तलाठी राजगुरूनगरमधून काम करीत होते. श्री भीमाशंकर देवस्थानचे सचिव खेडचे तहसीलदार आहेत. असे असताना तलाठी कोतवाल मात्र गैरहजर असल्याने भाविकांच्या समस्या सोडवल्या जात नव्हत्या. तब्बल 16 गावे आणि त्यांच्या वाड्या वस्त्यांमधील नागरिकांची मोठी गैरसोय होत होती. शिरगाव सजा कार्यालयातील पोलखोल झाल्यानंतर याभागातील शेतकरी, नागरिक नवीन तलाठी, कोतवाल यांच्या मागणीसाठी आक्रमक झाला.



### राजगुरूनगरातच सुरू केले तलाठी कार्यालय

» शिरगाव टोकावडे सजाचे तलाठी हे राजगरूनगर येथे राहतात तेथेच त्यांनी तलाठी कार्यालय सुरू केले आहे. या गावांतील नागरिकांना लागणारे आवश्यक कागदपत्र सर्व राजगुरूनगर येथे सबंधित तलाठ्यांनी नेले आहे, त्यामुळे शेतकरी, नागरिक, विद्यार्थी, विधवा ज्येष्ठ नागरिक यांना त्यांना लागणारे आवश्यक कागदपत्र दाखले घेण्यासाठी राजगुरूनगर येथे यावे लागत आहे. नागरिकांचा वेळ पैसा खर्च होत होता. टोकावडे,शिरगाव सजाचे कार्यालय असताना तलाठी कोतवाल या ठिकाणी उपस्थित राहत नव्हते. यामुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता.

### 16 गावांतील प्रमुख धडकले

» मुख्यमंत्री बहीण माझी लाडकी योजनेसाठी महत्त्वाची कागदपत्रे घेण्यासाठी राजगुरूनगर येथे तलाठी यांच्याकडे यावे लागत आहे. वेळेत कागदपत्र मिळत नसल्याने वेळ पैसा आदिवासी भागातील गरीब जनतेच्या वाया जातो. शिवाय मनस्ताप होतो हे सर्व टाळण्यासाठी शिरगाव, टोकवडे सजाला नवीन तलाठी द्यावा, अशी मागणी या दोन्ही सजामधील 16 गावांतील प्रमुख ग्रामस्थ मंगळवारी (दि. 2) निवासी नायब तहसीलदार यांच्याकडे केली. या मागणीचे निवेदन निवासी नायब तहसीलदार मदन जोगदंड यांनी स्वीकारले.

> “ शिरगाव सजासाठी राजेंद्र मोरे यांची तलाठी म्हणून नेमणूक केली आहेटोकावडे सजासाठी नवीन तलाठी तत्काळ दिला जाईल नागरिकांची अडचण सोडविली जाईल. कोणतीही अडचण आल्यास महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क करा. कोणीही कायदा हातात घेण्याचा प्रयत्न करू नये.
>
> - भाऊसाहेब बोरकर, तालुका बालविकास प्रकल्प अधिकारी, भोर

# राज्यातील कोतवाल आंदोलनाच्या पवित्र्यात

## मुळशीतील कोतवालांचे विविध मागण्यांकरिता तहसिलदारांना निवेदन

**पुणे | प्रतिनिधी**

राज्यातील कोतवालांनी आपल्या विविधि मागण्यांसाठी आंदोलनाचा इशारा दिला आहे. आंदोलनाच्या पवित्र्यात असलेल्या मुळशीतील कोतवालांनी विविध मागण्यांकरिता मुळशी तहसीलदार रणजित भोसले यांना निवेदन दिले आहे.

यावेळी आमच्या मागण्या सरकारपर्यंत पोहचविण्यासाठी सहकार्य करावे, असे कोतवालांच्या वतीने तहसीलदारांना सांगण्यात आले. कोतवालांच्या विविध मागण्यांबाबत महाराष्ट्र राज्य कोतवाल संघटनेने दि. 27 जून रोजी मान्यनीय मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, माननीय महसूल मंत्री यांना दिलेल्या निवेदनास तालुका कोतवाल संघटनेचा पूर्ण पाठिंबा व सहभाग मुळशीतील कोतवाल असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

कोतवालांचा विषय निकाली काढावा अन्यथा होणाऱ्या नुकसानी राज्य शासन स्वतः जबाबदार राहणार आहे. त्यामुळे तातडीने बैठक लावून गेल्या पन्नास वर्षांपासून च्या मागणीचा निर्णय व्हावा अशी मागणी सध्या जोर धरत आहे.

यावेळी अमित भंडलकर अध्यक्ष मुळशी तालुका कोतवाल संघटना, प्रकाश दिघे उपाध्यक्ष, चंद्रकांत हुल्लावळे कार्याध्यक्ष, गणेश पवार सचिव, बापू महाडिक सहसचिव, सुजाता हळंदे उज्वला खडके, संतोष चांदेरे, पोपट चव्हाण, गुलाब भिंगारे, सिताराम शिंदे, वंदना कदम, सुवर्णा बामगुडे कोतवाल उपस्थित होते.



### कोतवालांच्या आंदोलनाचे स्वरूप व टप्पे

» दि. 4 व 5 जुलै आझाद मैदान मुंबई धरणे आंदोलन
» 10 जुलै जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत काम बंद आंदोलन
» 22 जुलै लोणी (ता. राहाता) येथे बेमुदत आमरण उपोषण

### अशा आहेत कोतवालांच्या मागण्या

» राज्यातील सर्व कोतवालांना चतुर्थ श्रेणी लागू करावी.
» तलाठी व लिपीक पदामध्ये 25 टक्के कोटा राखीव ठेवावा.
» सेवानिवृत्त कोतवाल यांना पेन्शन व अनुकंप लागू करावा.
» कोतवाल पदाचे नाव बदलवून तलाठी सहाय्यक किंवा महसूल सेवक करणे.
» सेवानिवृत्त कोतवाल यांना 300 दिवसांचे रजा रोखीकरण मिळणे.
» कोतवालमधून शिपाई पदावर देण्यात येणारा 40 टक्के कोटा वाढवून 80 टक्के करावा.
» 8 फेब्रुवारी 2019 शासन निर्णयानुसार अटल पेन्शन बाबत सुधारीत जीआर काढावा.